# प्रकरण तिसरे

## 'पडझड' व 'धुराळा' या कादंबरीतील सामाजिक आशय

# प्रकरण तिसरे

# 'पडझड' व 'धुराळा' या कादंबरीतील सामाजिक आशय

## प्रास्ताविक

मागील प्रकरणात योगीराज वाघमारे यांच्या जीवनचरित्र व साहित्याचा थोडक्यात आढावा घेतला आहे. प्रस्तुत प्रकरणात 'धुराळा' व 'पडझड' या कादंबरीचा सामाजिक आशय पाहणार आहोत. त्याआगोदर जे साहित्य निर्माण होते त्यामध्ये समाजाचा कितपत वाटा असतो, साहित्य व समाज यांचे कसे संबंध असतात, साहित्य व समाज हे एकमेकावर कसे अवलंबून असतात यांचा थोडक्यात आढावा घेणार आहोत.

## साहित्य व समाज

साहित्य म्हणजे 'भाषा' या साधनाद्वारे केलेली कलानिर्मिती असते. साहित्यकृती ही कलावंतनिर्मित असते. साहित्याची निर्मिती करणारा कलावंत हा समाजातील एक घटक असतो. कलावंत हा कोणत्या तरी समाजगटात वाढत असतो. त्यामुळे त्या समाजातील परंपरा, धर्मकल्पना, रूढी, तत्वप्रणाली, आचारविचार , संकेत इत्यादीचे दर्शन लेखक साहित्यातून मांडत असतो. लेखकाचे व्यक्तिमत्व, त्याच्या सभोवतालचे वातावरण आणि मानवी जीवन यांच्या त्रिवेणी संगमातूनच साहित्य निर्माण होत असते.

व्यक्ती ही कितीही स्वंतत्र असली तरी त्याचे समाजाशी नाते अतूट असते. समाज निरपेक्ष अशी व्यक्ती कधीच नसते. साहित्यातून मानवी भाव, भावना, विचार व्यक्त होत असल्यामुळे मानवी जीवनमूल्याचा वेध साहित्यातून घेता येतो. साहित्यिक हा ज्या समाजात जन्मतो, वावरतो, त्या समाजाचा, देशाचा, इतिहास, भूगोल, संस्कृती यांचा परिणाम त्याच्या साहित्यकृतीवर होत असतो. साहित्यात प्रकट होणारा

जीवनाशय, साहित्याची आविष्कार पध्दती, प्रवृत्ती या सर्वांना सामाजिक संदर्भ प्राप्त होत असतो. साहित्यनिर्मिती ही व्यक्ती वैशिष्ट्यावर अवलंबून असते. म्हणूनच कोणत्याही एकाच कालखंडात, एकाच सामाजिक वर्गातील साहित्यिक वेगवेगळ्या प्रवृत्तीच्या साहित्याची निर्मिती करतात. लेखकाला आलेले अनुभव तो वेगळया धाटणीने, अर्थाने मांडून लेखक स्वत:चा नवा आत्माविष्कार साहित्यात मांडत असतो. कलावंत हा कितीही प्रतिभावंत असला तरी समाजातील सामाजिकतेच्या प्रभावाखालीच त्यांचे विचार आकारत असतात. या स्पष्टीकरणासाठी कुसुमावती देशपांडे म्हणतात, ''मानवी अंर्त:मनाच्या प्रवृत्ती मनाच्या वेगवेगळया थरातील संघर्ष अत्यंत चित्तवेधक असतात. परंतु त्यापैकी बऱ्याच प्रवृत्ती भोवतालच्या समाजरचनेने एकंदर परिस्थितीने निर्माण केलेल्या असतात.''[१]

कलावंत हा समाजाचा घटक असल्यामुळे समाजात घडणाऱ्या धार्मिक, राजकीय, आर्थिक, वाङ्मयीन चळवळीचा प्रभाव त्याच्या लेखणीवर होत असतो. तसेच त्या काळातील सामाजिक समस्यांचा परिणाम लेखणीवर होत असतो.

। एखाद्या समाजातील विशिष्ट काळातील जीवनाविषयीची कल्पना, आदर्श जीवनाविषयीचे त्यांचे संकेत, जीवनाविषयीचे त्यांचे भान या बाबत निष्कर्ष काढण्यासाठी त्या समाजाचे साहित्य उपयोगी ठरते. तसेच प्रचार, स्वप्नरंजन, दोन घटका करमणूक यासाठी सुद्धा साहित्याचा वापर केला जातो.

लेखकाप्रमाणेच 'वाचक' हा समाजाचा घटक असतो. तो ज्या समाजव्यवस्थेत जगत असेल, त्या व्यवस्थेत असणाऱ्या विविध सामाजिक संस्कारातून त्यांची जडणघडण होत असते. समाजामुळे वाचकाच्या अभिरूचीची जडणघडण होत असते. अशा रसिक वाचकाला साहित्यातून नवी माहिती मिळू शकते. आपल्या जीवनानुभवाशी संवादी असा अनुभव येऊ शकतो. आपल्या मनात असलेल्या एखाद्या स्वप्नांची पूर्तता झाल्याचा अनुभव, तसेच त्या व्यक्तीला प्रेरणा, तर एखाद्या व्यावहारिक प्रश्नाचे उत्तर या गोष्टीची पूर्तता साहित्याद्वारे मिळू शकते.

लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण त्यांची साहित्यविषयक भूमिका, त्यांची निर्मिती समाजसापेक्ष असते. त्याशिवाय लेखकाला समाजात मिळणारी मान्यता, उपेक्षा, मानमरातब, अवहेलना या साऱ्यांचा संबंध सामाजिकतेशीच येत असतो.

साहित्यकृती निर्माण करणारा लेखक, या कलाकृतीचा आस्वाद घेणारा रसिक, साहित्यातून व्यक्त होणारा आशय आणि साहित्यासाठी जी भाषा वापरली जाते ती भाषा हे सर्व विशिष्ट समाजाचाच एक भाग असतो. साहित्याच्या या स्वरूपामुळे साहित्याला एक सामाजिक रूप प्राप्त होते.

साहित्य व विशिष्ट समाजामध्ये असणारी संस्कृती यांचे नाते दुहेरी स्वरूपाचे असते. एकतर संस्कृती ही साहित्याच्या निर्मितीचे कारण ठरत असते. तर दुसरे म्हणजे साहित्य हे एक सांस्कृतिक शक्ती ठरून संस्कृतीच्या जडणघडणीत सहभागी होते. यातून साहित्य व संस्कृती याचे नाते स्पष्ट होते. कोणत्याही देशातील संस्कृतीची जडणघडण करण्यामध्ये साहित्याचा फार मोठा वाटा असतो.

**'पडझड' या कादंबरीचा सामाजिक आशय**

एकेकाळी ग्रामजीवन अत्यंत समृध्द होते. पण काही काळानंतर या ग्रामजीवनाची, संस्कृतीची पडझड सुरू झाली व त्याचबरोबर ग्रामीण भागातील लोकांची नैतिकतेची कशी पडझड झाली आहे याचा संवेदनशील मनाने घेतलेला वेध म्हणजे 'पडझड' ही कादंबरी होय.

आंबेडकरी विचारांच्या पाऊलखुणा जपणारी 'पडझड' ही कादंबरी आहे. गावकुसाबाहेरचे जीवन जगत असताना जे कडू-गोड अनुभव लाभलेत त्या अनुभवाची शिदोरी या कादंबरीतून व्यक्त झालेली दिसते.

कादंबरीचे नायक लेखक आहेत. ते येरमाळा या छोट्या गावातून शिक्षण घेऊन नोकरीनिमित्त शहरात स्थायिक झालेले असतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या त्रिसूत्री मंत्राचा 'शिका ! संघटित व्हा! संघर्ष करा.' याचा अंगीकार करीत ते

भीमनगरमधील पहिला पदवीधर, माध्यमिक शिक्षक व शिक्षणाधिकारी या उच्चपदावर विराजमान असतात. स्वातंत्र्य दिनाच्या सुवर्णमहोत्सवात गावातील प्राथमिक शाळेच्या वतीने याच शाळेतील माजी कर्तबगार विद्यार्थ्यांचा सत्कार करायचे ठरते. त्या गावाचे शिक्षण विस्तार अधिकारी लेखकांना सत्कारार्थी असल्याचे निमंत्रण सोलापूरला येवून देतात. त्यावेळी लेखकांना खूप आनंद होतो. आपल्या गावात माझा सत्कार होणार या विचाराने ते मोहरून जातात. लेखकांच्या पत्नीचा नकार असूनदेखील ते गावाकडे जाण्यास तयार होतात.

माणूस हा कितीही मोठा झाला तरी त्यांचे आपल्या मायभूमी व समाजाविषयी आपुलकी असते. याचे दर्शन यातून घडते. लेखक बसने आपल्या गावी येतात. पण ते गावात स्टँन्डवर न उतरता अलिकडेच उतरून ते भीमनगरात येतात. लेखकांनी लहान असताना पाहिलेले भीमनगर व साठेनगर यामध्ये खूप बदल झालेला असतो. या नगरानी 'शहराकडे चला' या आज्ञेचे पालन केलेले दिसते.

लेखक भीमनगरमध्ये आल्यानंतर तेथील चंदू कांबळे यांची ओळख होते. लेखक चंदू कांबळे याला सोबत घेवून भीमनगर व साठेनगर मधील घटनांचा, पात्रांचा उलगडा करतात व कथानक पुढे सरकते. सर्वप्रथम लेखकाना भीमनगरमधील सर्वात वयस्कर व्यक्ती तात्या भेटतात. तात्या पूर्वी तमाशात काम करीत होते. तात्या तमाशात सोंगाड्याचे काम करायचे. 'बुरकुंडराव' हे तात्याचे तमाशातील नाव होते. त्यामुळे सवर्ण समाजातील काही व्यक्ती तात्यांना 'बुरकुंड्या' म्हणून चिडवत असत. त्यावेळी तात्या म्हणायचे ''कोण हाय बे?'' पण लगेच तमाशातली पोझ घेऊन उद्‌गारायचे 'हूकूम महाराज!' यातून सवर्ण समाजाचा दलित समाजावर असणारा धाक स्पष्ट होतो.

त्यानंतर मारूती मांगाविषयी चंदू कांबळे माहिती सांगतो. गावात पुरेशी मजूरी मिळत नाही. म्हणून मारूती हा मुंबईला उदरनिर्वाहासाठी जातो. भंगार गोळा करणे, कचराकुंडीत शिरून कपटे-कागद, काचा गोळा करायचा, व ते घाटकोपरला

जावून विकायचा. एके दिवशी त्याला कचराकुंडीत सोन्याची दहा बिस्किटे सापडतात. पण ती घ्यावी की घेवू नये असा विचार करतो. शेवटी ती बिस्किटे घेवून गावी येतो. पण गावी आल्यानंतर मनातील भीतीमुळे त्याला ते सोने पचविता आले नाही. एके दिवशी गावच्या पोलिस पाटलाला समोर बघताच मारूतीची अवस्था ''वाघरू बघितल्यावर शेरडू जसं भेदरतं तसं!''[२] अशी अवस्था मारूतीची होते. पोलिस पाटलाच्या घरची परिस्थिती सुधारते. ऐश्वर्य प्राप्त होते. पण काही दिवसात अपघातात पाटलाचा मूत्यू होतो. या बातमीने शोषक समाजातील मारूती मांग हा आंनदित होतो. यातून लेखकांनी गावातील शोषक व शोषित यांच्यातील संघर्ष वैविध्यतेने मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

लेखकानी दलित समाजात असणाऱ्या स्त्रियांच्या परिस्थितीचे चित्रण केले आहे. मारूती मांग यांच्या व्यक्तिरेखेतून स्त्रियाबद्दल असणारा लोकांचा दृष्टिकोन नजरेस आणला आहे.

मारूती हा मातंग समाजाचा असतो. तो पुरूषप्रधान संस्कृतीचा एक महत्त्वपूर्ण वाहक आहे. ''मारूतीनं किती बायका केल्या ते माहीत नाही. पण मुंबईला गेला न सहा महिने राहून आला की त्याच्याबरोबर नवी बाई असायची.''[३] मारूतीला नवीन स्त्री विषयी विचारतांना ''जित्राब'' असा शब्दप्रयोग करण्याची पद्धत होती. यातून दलित समाजातील स्त्रीची कशी बिकट अवस्था होती याचे दर्शन यातून घडते.

स्वातंत्र्य मिळण्याअगोदर व स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही समाजावर शोषिताचेचं राज्य होते. त्यामुळे निवडणूकीच्या माध्यमातून सत्तेवर येणारा समाज शोषितांचाच प्रतिनिधी असतो. हे शोषित प्रतिनिधी गावचा विकास करण्याऐवजी आपला कसे स्वार्थ साधून घेतात याचे दर्शन कादंबरीत आले आहे.

भीमनगर व साठेनगर या दोन्ही वस्त्यांना स्वतंत्र दिव्याची गरज असताना तेथे दोन्ही वस्त्यांमध्ये एकच सार्वजनिक दिवा लावलेला आहे. तसेच त्या वस्तीतील गटार

ही एखादाही फूट खोल खोदलेली नसलेली सिमेंटचा पत्ता नसलेली अशी ही गटार म्हणजे खोऱ्याने काढलेली चर म्हटली तरी चालेल. परंतु कागदोपत्री पक्की गटार बांधल्याचे नोंद असल्याचे संदर्भ दाखवतात. यातून भ्रष्ट व्यवस्थेचे दर्शन घडते. पण याउलट विरोधाभास दाखवण्याचा प्रयत्न लेखक करतात. अशा या दोन्ही वस्तीमध्ये सुविधा नसताना मात्र सरपंचाच्या अंगणात मात्र फरशी घातलेली आहे. त्यांच्या दारात लाईटचा खांब आहे.

भीमनगरमधील शेटीबादादा या व्यक्तिचित्रणातून एका सैनिकाच्या बिकट अवस्थेचे चित्रण लेखकानी या कादंबरीत मांडले आहे. शेटीबादादा हा भीमनगरात राहणारा सगळ्यात उंच व शहाणा व्यक्ती असतो. तो दुसऱ्या महायुद्धात लढलेला सैनिक असतो. आपल्या आयुष्यातील घडलेल्या घटना सांगणे, युद्धकाळातील वर्णने तसेच सैन्यातील शिस्त. अशा विषयावर भरभरून बोलणारा शेटीबादादा मात्र आपल्या आयुष्याच्या लढाईत पराभूत झालेला असतो. अशा शेटीबादादाचा शेवट अत्यंत वाईट पद्धतीने होतो. याचे दाहक चित्रण लेखकानी मांडलेले आहे.

शेटीबादादाच्या माध्यमातून स्वातंत्र्यपूर्व काळातील सैनिक व स्वातंत्र्योतरकाळातील सैनिक यातील साम्य व भेद ही ते सांगतात. भारतीय सैन्यातल्या सैनिकाला निवृत्तीनंतर समाजात, कुटुंबात कशा पद्धतीची वागणूक मिळते. याचा प्रत्यय शेटीबादादा या पात्रातून लेखक नजरेस आणतात.

'पडझड' या कादंबरीत अनेक समस्यांचे चित्रण आले आहे. त्यामध्ये सर्वात महत्त्वपूर्ण व स्मरणात राहतात ते म्हणजे स्त्री चित्रण. विशेषत: दलित समाजातील स्त्री चित्रण मांडण्याचा प्रयत्न लेखकानी केला आहे. दलित स्त्री ज्या गावात, समाजात जन्मते, त्या गावाकडून, दलित समाजाकडून तिची सतत उपेक्षा होत असते. याचा प्रत्यय आणणारी सरू ही स्त्री व्यक्तिरेखा लेखकानी सादर केली आहे. सरू ही नानाची मुलगी असते. नानानी रानोमाळ भटकून शेण गोळा करून भलामोठा शेणखताचा उकिरडा केला व त्या उकिरड्यावरतीच थोरल्या पोरीच लग्न केले जाते.

सरू सासरी नांदायला जाते. पण सरूच्या चुलत सासूकडून सरूच्या संसारात विघ्ने येतात. कारण सरूचा पती व त्याची चुलती यांचे शारीरिक संबंध असतात. यामुळे सरू व तिचा पती याच्यांमध्ये सतत भांडण होत असते. शेवटी सरूचा पती सरूला नांदवण्यास नकार देतो व तिला माहेरी आणून सोडतो. मध्यस्थाकडूनही काही मार्ग निघत नाही. नवऱ्याला कितीही समजावले तरी तो नांदवण्यास तयार होत नाही. शेवटी आज ना उद्या राग कमी होईल या उद्देशाने सरूला तात्पुरते माहेरात राहण्यास सांगतात व त्यानंतर त्या गोष्टीकडे कोणी मध्यस्थी लक्ष देत नाही. अशा तऱ्हेने शेवटी सरूच्या आयुष्याची वाताहात होते.

लेखक सरूच्या घरी गेले असताना लेखकांना चहा करून देत असताना तिचा पदर जळतो व ती त्याकडे जास्त लक्ष न देता ती विझवते, पण जळालेला पदर जरी तिने विझवला असला तरी सरूचे जीवन मात्र होरपळलेले आहे असे प्रभावी चित्रण लेखकानी केलेले आहे. दलित समाजामध्ये स्त्रीला कोणकोणत्या हालअपेष्टा भोगाव्या लागतात. याचे दर्शन घडते.

दलित समाजातील स्त्री ही कशी कणखर स्वाभिमानी असते याचा प्रत्यय सरूच्या बोलण्यातून स्पष्ट होते. ती म्हणते, 'राहीन बीन नवऱ्याची. जवर मायबाप सांबाळतील तवर त्यांच्यात राहीन, ज्या दिशी त्यानलाबी जड वाटल तवा म्या माजं कायबी करून घेईन. पण तुमा कुणाच्या नावाला बट्टा लावणार नाय.''[४] येथे सरूचा करारीपणा दिसून येतो.

त्याचबरोबर दलित समाजातील स्त्री ही अबला असल्याचे दिसून येते. लेखकांना ज्याप्रमाणे जुन्या व्यक्तींची उणीव भासत होती त्याप्रमाणे त्यांच्या गावी असणाऱ्या झाडाची सुद्धा उणीव भासत होती. त्यामुळे त्यांनी अनेक झाडांची वर्णने कादंबरीत केली आहेत. एकेकाळी सुखी संपन्न असणारे ग्रामजीवन आज मात्र विज्ञानयुगाने चमत्कार केल्यामुळे तेथील नैसर्गिकता संपली आहे. वाढत्या

राहणीमानामुळे झाडाची भरमसाठ तोड झाली. पाऊसकाळ कमी झाला. भीमनगरमध्ये पूर्वी खुप झाडी होती. गाव व भीमनगर मधील पाटलाच शेत. त्याच्याभोवती झाडी. तसेच पावसाळ्यात येणारे ओढ्याचे भयंकर पाणी, पूर्वी गावे कशी पाऊस पाण्याने समृद्ध होती. लेखकानी यातून पूर्वकाळातील नैसर्गिक परिस्थिती व आताच्या काळातील नैसर्गिक परिस्थिती दाखवण्याचा प्रयत्न या कादंबरीतून केला आहे. लेखकांनी वडाच्या झाडाचे अत्यंत प्रत्ययकारी चित्रण केले आहे. लेखकाच्या गावातील हे वडाचे झाड खूप महत्त्वपूर्ण होते कारण त्याच्याभोवती अनेक घटना घडलेल्या होत्या. ते खूप जुने व मोठे झाड होते. त्या झाडाखाली मोठा बाजार भरत असे. वडाच्या झाडाखाली अनेक लोक विसावा घेत असत. माणसांच्या बरोबर पक्ष्यांना सुद्धा फार मोठा आश्रय त्या वडामुळे मिळत होता. असा हा वड काळाच्या ओघात कसा नष्ट झाला आहे व त्यामुळे तेथील भागाला असलेली शोभा, आठवणी कशा नष्ट झालेल्या आहेत याचे प्रभावी चित्रण लेखकांनी केले आहे. ग्रामीण भागात झाडांचे महत्त्व कसे असते हे पटवून देण्याचा प्रयत्न लेखक या कादंबरीतून करतात.

खेड्यातील जीवन दिवसे-दिवस बदलू लागले आहे. प्रत्येक स्तरातील लोक शिकू लागले आहेत. त्यांच्या ज्ञानात भर पडत आहे. चांगल्या, वाईटाची जाणीव लोकांना होत आहे. आज लोक विज्ञानाच्या मागे धावत आहेत. शहराप्रमाणेच खेडीसुद्धा विकास पावत आहेत. जुन्या प्रथा, रूढी, अंधश्रद्धा या कमी होवू लागल्या आहेत. लोकांचा देव-देवतावरील विश्वास कमी होवू लागला आहे. त्यामुळे ग्रामदेवतांच्या मंदिराला अवकळा प्राप्त झाली आहे. आंबेडकरी विचार जोपासणारे लोक देवतांकडे फिरकेनासे झालेत. याबाबतीत लेखकानी कादंबरीत मांडलेले एक विधान महत्त्वपूर्ण वाटते, "अरे, देवदेव म्हणून आपण ज्यांना भजत होतो त्या देवानं तर आपला उद्धार केलाच नाही उलट स्वत:ची अवकळाही थांबविता आली नाही. जो स्वत:ला वाचवू शकत नाही तो दुसऱ्याला काय वाचविणार?"[५]

यातून दलित समाज जो पुर्वी देवपणाच्या दबावाखाली दडपलेला होता. ती स्थिती आज नष्ट झाली आहे. याचे दर्शन या विधानातून नजरेस येते. यातून त्यांनी आंबेडकरी तत्त्वज्ञान व्यक्त केले आहे व आजच्या दलित समाजातील होत असलेला बदल दाखवण्याचा प्रयत्न केला आहे.

लेखकाना जीवाला चटका लावणारी जशी माणसे भेटली तसेच फसवणूक व धोका देणारी माणसेही भेटली आहेत. लग्न होत नाही म्हणून एस. आर. पी. त कामाला आहे असे खोटे बोलून भोळ्या भाबड्या 'लोभीच्या' बापाला व भावाला फसवून लोभीबरोबर लग्न करणारा या एस. आर. पी. जवानाचे पात्र लेखकानी अत्यंत दर्जेदार पद्धतीने मांडलेले आहे.

शेतकरी हा इतरांना कामाला न घेता स्वत: घरादाराबरोबर कामे करू लागला. त्यामुळे इतर लोकांना रोजगार मिळेना. एखादा व्यवसाय सुद्धा चालेना. त्यातच गावात होणारी भांडणे, संघर्ष, राजकारण या प्रकारामुळे गावातील साध्या भोळ्या, गरीब दलित लोकांचे हाल होवू लागले. त्यामुळे या लोकांनी शहराकडे धाव घेतली. यामध्ये बाजीची भावळी ही घरदार सोडून शहराकडे गेली. यामुळे खेडी, गावे ओस पडू लागली आहेत. याचे चित्रण या कादंबरीतून घडते. पण काही लोकांना मात्र यापेक्षा वेगळ्या कारणासाठी गाव सोडावे लागत असे. किसन मांगाच्या बाबतीत ही गाव सोडण्याचे कारण वेगळेच होते. किसना मांग हा पाटलाच्या शेतात मजूर काम करीत होता. अगदी मनापासून प्रामाणिकपणे व इमानदारीने काम करणारा किसना होता. त्याच्या जीवनाचे ध्येय एकच होते ते म्हणजे मालकाची भरभराटी म्हणजे आपल्या जीवनाची भरभराटी असे माननारा किसना होता. पडल ते काम अगदी आंनदाने करीत असे. अगदी तितक्याच आनंदाने , प्रामाणिकपणाने किसनाची बायको धुरपा ही पाटलाच्या वाडयात काम करीत असे पण या बदल्यात कोणतीही मोठी अपेक्षा त्यांची नसे. असा साधा भोळा किसना व त्याची पत्नी धुरपा यांचा संसार सुखाने चाललेला होता. किसना हा

शेतीबरोबर गुऱ्हाळात सुध्दा काम करु लागला. एके दिवशी अति कष्ट केल्यामुळे व तेथील धुरामुळे तो कायलीला जाळ घालीत असताना त्याचा पाय घसरून तो त्या आगीत जावून पडतो. त्यावेळी त्याला तेथील लोक बाहेर काढतात. किसना हा गंभीर जखमी होतो. त्यावेळी त्याला पाटलाकडून फक्त दवाखान्याचा खर्च दिला जातो पण त्यांच्या भावी जीवनाविषयी जरासुध्दा दया माया न दाखवता तसेच कोणत्याही प्रकारची मदत न देता त्याला हाकलून देतो व म्हणतो ''कुठंबी जा, दुनिया वस पडली नाय.'' यातून लेखकानी गरीब दलित लोकांच्याकडून कष्ट करून घेऊन सवर्ण समाजातील लोक कसे स्वार्थ साधतात व शेवटी दलित गरीब कुटूंबाची कशी वाताहात होते यांचे प्रत्ययकारी चित्रण केले आहे.

लेखकानी या कादंबरीत अनेक व्यक्तिरेखांचे चित्रण केले आहे. तसेच गावातील जुनी झाडे, पडकी घरे याचेसुध्दा चित्रण करतात. लेखकानी या गोष्टीबरोबरच त्यांच्या गावात पूर्वी असणाऱ्या खुटकंदिलाचे वर्णन सुध्दा महत्वपूर्ण ठरते. अशा खुटकंदिलाखाली अनेक घटना, प्रसंग घडलेले असतात. गावात खुटकंदिलाचे स्थान अन्यन्यसाधारण होते. चौकोनी आकार असलेला चारीबाजूने काच आणि वरती रेघारेघा व बारीक छिद्राची छाकणी असलेला त्यात भोगळीचा दिवा असलेला असा खुटकंदिल होता असे खुटकंदिल प्रत्येक गावात असत. आंबेडकरी चळवळीपूर्वी भीमनगर व साठेनगर मधील सर्व गोष्टी, व्यवहार हे खुटकंदिला जवळच होत होते. अशा खुटकंदिलाचे स्थान काळाच्या ओघात इतर जुन्या गोष्टीबरोबर आज संपुष्टात आले आहे. व त्यांची जागा आज विजेच्या खांबाने घेतली आहे.

लेखकाच्या गावातील खुटकंदिलाच्या देखरेखीचे काम श्रीपती अण्णा करीत असे. हे खुंटकदिल कमी तेलामुळे रात्रभर चालत नसे पण लोकांना वाटत असे की अण्णा काहीतरी फसवाफसवी करतोय, याचे ही चित्रण लेखक कादंबरीत करतात.

खुटकंदिलाखाली काही घटना घडलेल्या असतात त्याचे चित्रण लेखकानी कादंबरीत केले आहेत. राणोजी बनसुडया आणि त्याची बायको केराजिजी यांना समाजात घेण्यासाठी केलेला न्यायनिवाडा हा खुटकंदिलाखालीच झालेला असतो. राणोजी बनसुडया गावचा रहिवाशी नसतो. राणोजी हा आपल्या बायका पोरासह सुगीच्या निमित्ताने बाहेर गावाहून आलेला असतो व आपल्या कुटुंबासह गावात स्थायिक झालेला असतो. पण त्यांना कोणत्याही समाजकार्यात भाग घेता येत नव्हता शेवटी समाजाच्या रितरिवाजानुसार सर्वाच्या समक्ष राणोजीच्या कुटुंबाला समाजात घेतले जाते. पण त्याबद्दल राणोजीकडून पंचाना पानसुपारी व भावकीला जेवण घेतले जाते.

यातून लेखकांनी दलित समाजातील रीतिरीवाज व समाजाचे महत्व पटवुन देण्याचा प्रयत्न केला आहे. समाजात येण्यासाठी राणोजीचे विधान महत्वपुर्ण वाटते. ‘‘म्या इथच मरणार, माझ मढं तूमच्या खादयावरच गेलं पाहयने ता मला तुमचा बिछाईत वतनदार करून घ्या; किती दिवस म्या गुडेकरी म्हणून राहू?’’.

लेखकानी राणोजीच्या माध्यमातून दलित समाजात असणाऱ्या जात-पंचायतीचे चित्रण समाजात नसल्यामुळे येणाऱ्या अडचणी याचे चित्रण केले आहे. असाच आणखी एक प्रसंग खुटकंदिलाखाली घडला होता. त्याकाळी महाराष्ट्राचा एक हिस्सा रझाकाराच्या जुलूमाला बळी पडला होता. अशा रझाकारांनी केलेल्या हल्यामध्ये एका दलित कुटूंबाची वाताहात होते. अनुसया ही लेखकाची मावशी असते. रझाकारांनी केलेल्या हल्यात ती गावातून हरवते, परत ती तब्बल २० वर्षानंतर पुन्हा आपल्या बहिणीकडे येते. अशा बहिणीची गाठभेट ही या खुटकंदिलाच्या जवळ होते. पुर्वी होणाऱ्या रझाकाराच्या अत्याचाराची व त्याचा समाजव्यवस्थेवर होणाऱ्या विपरीत परिणामाचा आढावा अनुसया या व्यक्तिरेखेतून मांडण्याचा प्रयत्न लेखकांनी केला आहे.लेखकांना रझाकाराच्या हैदोसावर चार ते पाच रक्तरंजित पाने रंगविता आली असती परंतु नेमक्याच शब्दात मांडून त्यांनी त्यावेळेचे गांभीर्य साधलेले आहे.

लेखकाच्या गावी असणारा येडाईचा डोंगर याचेसुध्दा चित्रण लेखक कादंबरीत करतात. येडाईचा डोंगर हा गावातील लोकांचा आधार होता गावातील लोकांना सरपण, गोवऱ्या, झाडपाला तसेच शेळया-मेंढया चारण्यासाठी सुध्दा या डोंगराचा उपयोग होत होता. अशा डोंगरावरील अनेक आठवणी लेखक या कादंबरीत चित्रित करतात.लेखकांनी पाहिलेल्या बहात्तरच्या दुष्काळाचे प्रत्ययकारी चित्रण कांदबरीत केले आहे. त्या दुष्काळाचा जनजीवनावर कशा पध्दतीचा परिणाम होतो. त्यामुळे लोकांची होणारी हालअपेष्टा, त्यांचे शोषण हया साऱ्या घटनांचा आढावा लेखकांनी या कांदबरीत घेतला आहे. दुष्काळामुळे गावातील गरीब-श्रीमंत असे सर्वजणच खडीकेद्रांवर कामाला जातात. गावात अन्नधान्य नसल्यामुळे त्या काळात लोक येलो-मिलो रेशनचा गहू खावून जगू लागली. अशी वाईट अवस्था गावाची झाली.पण या परिस्थितीचा फायदा खडीकेद्रांवर कामावर असणाऱ्या मुकादम व कारकुनांनी करून घेतला. त्यांनी तेथील लोंकाचे खूप शोषण केले. तसेच पैशाचे आमिष दाखवून बायका-पोरींचा गैरवापर केला. लेखकानी दुष्काळाचे चित्रण करून लोकांच्यावर होणाऱ्या अत्याचाराचे तसेच मुकादम व कारकुन यांच्या प्रवृत्तीचे व उध्वस्त झालेल्या कुटूंबाचे प्रत्ययकारी चित्रण या कांदबरीतून नजरेत आणतात.

लेखकानी त्यांच्या वस्तीत असलेल्या चिंचेच्या झाडाबद्दल काही आठवणी सांगितल्या आहेत. ज्याप्रमाणे गावात जसे मोठे व जुने झाड म्हणून वडाला समजले जाते, त्याच प्रमाणे लेखकाच्या वस्तीतील सर्वात मोठे चिंचेचे झाड होते. त्या चिंचेखाली नंदीबैलवाले, कैकाडी, अस्वलवाले अशा विविध समाजातील लोक त्या ठिकाणी येत असत. व झाडाखाली झोपडी करून राहत असत. हे लोक नंदीबैल, माकड व अस्वल घेवून गावात फिरत असे. यांची राहणी एकदम साधी असायची. गावात एक-दोन दिवस राहून ते पुढच्या गावी जात असत. त्यानंतर शेतकऱ्यांना शेतात ताली बांधून देणारे मातीवडार व डक्कलवार येत असत. तसेच चिंचेच्या झाडाखाली

बसणारा पांगुळ, बहुरूपी, गोसावी, नाथपंथी, फकीर यांचे येणे चिंचेखालीच होते. त्यामुळे अनेक घटनांचा पुरावा असलेले चिंचेचे झाड हे काळाच्या ओघात नष्ट झाले व तेथील जागा भकास झाली.

लेखकानी चिंचेच्या झाडाच्या माध्यमातून अनेक घटनाप्रसंग मांडण्याचा प्रयत्न केला आहे. समाजात पुर्वापार चालत असलेल्या रूढी, परंपरा, त्यावेळचे लोक, त्यांची संस्कृती, व्यवसाय, राहणीमान यांचा उल्लेख कादंबरीत चित्रित झाला आहे.

भीवदादा व शांता आक्का या पती-पत्नीच्या संसाराची कशी वाईट अवस्था होते यांचे दाहक चित्रण लेखक या कादंबरीतून करतात. भीवदादा हा गँगमन होता. भीवदादा व शांताआक्का खावून-पिऊन सुखी असतात. पण या दाम्पत्याला मूलबाळ नव्हते. त्यामुळे शांताआक्का झुरत असे. एके दिवसी भीवदादा खूप दारू पिवून येतो. यावेळी भीवदादा व शांताक्का यांच्यात जोरदार भांडण होते. भीवदादा रागाच्या भरात शांताक्काला दांडक्याने मारतो. त्यामुळे ती जागीच मरण पावते. समाजामध्ये मूलबाळ न होणे हा दोष फक्त स्त्रियाच्यांवरती लादला जातो व तिचे कसे शोषण केले जाते याचे दर्शन लेखकानी या ‘पडझड’ कादंबरीतून केले आहे. फार पुरातन काळापासून पुरूष प्रधान संस्कृतीकडून स्त्रीवर होणारा अत्याचार आजपर्यंत सुरूच आहे. या गोष्टीवर लेखकानी नेमके बोट ठेवले आहे.

‘पडझड’ या कादंबरीमध्ये ‘सिद्धार्थ पांडागळे’ या व्यक्तिरेखेतून दलित पँथर चळवळीचा संदर्भ आलेला आहे. अशा या सिद्धार्थच्या जीवनाची झालेली परवड लेखकांनी कादंबरीत चित्रित केली आहे. समाजात असलेली जातीयता, दलितांचे केले जाणारे शोषण यांचा प्रत्यय आणणारा ‘नामातंराचा लढा’ या माध्यमातून कादंबरीमध्ये चित्रित करतात. मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यावरून झालेले आंदोलन आणि त्या आंदोलनामुळे सवर्ण समाजातील लोकानी दलित समाजाचा केलेला छळ व नामांतर कालखंडातील मराठवाडा विभागातील परिस्थिती ही मोजक्याच

शब्दात लेखकानी मांडली आहे. त्यामध्ये सहभागी होण्यासाठी अनेक बौद्ध बांधव सामील होणार होते. अशा कार्यक्रमात लेखकाच्या गावच्या एक वृद्ध स्त्री शेवंताबाई हीने दर्शवलेली तयारी म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर असणाऱ्या गाढ भक्तीचे प्रत्यय आणणारे उदाहरण ठरते. यासंदर्भात शेवतांबाईचे पुढील विधान महत्त्वपूर्ण वाटते. ''बाबांच्या नावासाठी जीव द्यायची तयारी हाय माजी, आता मागं काय राहलंय? भिऊन राहण्यापरीस नावासाठी मरण आलेल बरं.''[८] अशा समाजप्रेमी शेवतांबाईचे दर्शन लेखक कादंबरीतून करतात.

लेखकाचा घनिष्ठ व सर्वात जवळचा मित्र आत्माराम होता. तो सवर्ण समाजातील असूनसुद्धा त्याने लेखकाशी मैत्री केली होती. अशा आत्मारामानी लेखकाबरोबर शिक्षण करीत शिक्षकाची नोकरी केली पण आत्माराम यांना प्रापंचिक आयुष्यात सुख मिळाले नाही. आत्माराम व त्यांचा मुलगा यांच्यात सतत भांडण होत असे. यातून एके दिवशी आत्मारामनी आत्महत्या केली. लेखकानी आत्मारामच्या जीवनाची शोकांतिका या कादंबरीतून चित्रित करतात.

अशा वेगवेगळ्या व्यक्तींच्या आठवणी पाहत व भीमनगर व साठेनगरमधील घराची पडझड पाहत ते गावात येतात. गावामध्ये सुद्धा खूप कायापालट झालेला असतो. गावामध्ये अनेक सोयी-सुधारणा झालेल्या असतात. याचा आढावा लेखकांनी घेतला आहे. शेवटी लेखक आतुरतेने कार्यक्रम स्थळावर जातात. परंतु तेथे सर्व सत्कार मूर्तींचा सत्कार होतो. परंतु लेखकाचा जाणूनबुजून सत्कार केला जात नाही. शेवटी कार्यक्रम संपतो. तेव्हा लेखक तेथून निराश मनाने चंदूबरोबर भीमनगरमध्ये येतात. या घटनेबद्दल डॉ. चंदनशिवे यांचे मत महत्त्वपूर्ण वाटते. ''लेखक ज्या गावात जन्माला आला त्याच गावाने निमंत्रण पाठवून मोठा अधिकारी झालेला पुरगा म्हणून आज पन्नास वर्षानंतर बोलावून त्याची त्याला जात दाखवून दिली.''[९] यातून माणसाच्या नैतिकतेची कशी पडझड झाली आहे हे स्पष्ट होते. पण या घटनेवर लेखकानी संयमपणा पाळलेला

आहे व या घटनेबद्दल ते कुठेही आगपाखड अथवा भाष्य करीत नाहीत. त्यानंतर लेखक गावी जाण्याच्या तयारीत लागतात. पण तेथील यमुना मावशी म्हणते, "मी तरी जाऊ देईन." जी माणसं आपल्या जातीची, जीवाभावाची असतात तीच माणसे आपल्याला मान सन्मान देतात. याचा प्रत्यय या विधानातून नजरेस येते. त्यानंतर भीमनगर मधील काही मुले चंदूकडे येतात व म्हणतात, "अनायसे साहेबांच्या हस्ते नवीन बोधीतत्त्व गायन पार्टीचे उद्‌घाटन व तसेच त्यांचा सत्कार करूया." अशा पद्धतीने या कादंबरीचा शेवट होतो.

**'धुराळा' या कादंबरीचा सामाजिक आशय**

महाराष्ट्रात सहकारी साखर कारखान्यांची फार मोठ्या प्रमाणात निर्मिती झाली आहे. यामुळे महाराष्ट्रातील लोकांना रोजगार मिळू लागला. जवळच्या खेड्या-पाड्यातील लोक अशा कारखान्यामध्ये कामाला जावू लागले. विशेषत: दुष्काळी भागातील लोक टोळी-टोळीने या फॅक्टरीवरती ऊस तोडणी कामा करीता जावू लागले. अशा ऊस तोडणी कामगाराच्या दु:खाचे, समस्येचे चित्रण 'धुराळा' या कादंबरीतून योगीराज वाघमारे करतात. या कादंबरीचा नायक 'सुदामा' आहे. तो अनेक ऊसतोडकरी लोकांचे प्रतिनिधी म्हणून कादंबरीत निदर्शनास येतो. अशा या सुदामाची कर्मकहाणी व फटकरीने केलेला घात यांचे प्रभावीचित्रण 'धुराळा' या कादंबरीत आले आहे. घरी शेती असूनही रोख पैशाच्या लोभापायी माणसे ऊसतोडणीसाठी कामावर जातात. व त्यांच्या पदरात कांहीच पडत नाही अशा ऊस तोड कामगारांच्या व्यथा वेदनांचे चित्रण 'धुराळा' या कादंबरीत आले आहे. योगीराज वाघमारे यांचा आजपर्यंतच्या साहित्यलेखनाच्या विषयापेक्षा वेगळा विषय आंबेगावातील हॉटेल शिवशंकर मध्ये असणाऱ्या फोनोच्या गीताने 'धुराळा' कादंबरीची सुरूवात होते. या हॉटेलमध्ये सुदामा हा कामगार असतो. तिथे आलेले गिऱ्हाईक सुदामाची चेष्टा-मस्करी करीत असे. व एखादी चूक झाली की मालक रागावत असे पण साध्या, भोळा सुदामाला याबद्दल कधीच राग येत नसे.

सुदामाने आपल्या जीवनाविषयी काहीच माहिती कुणाला दिलेली नसते. मालकाने सुदामाला कामाठी म्हणून त्यास कामावर घेतलेले असते. सुदामाच्या कष्टामुळे शिवशंकर हॉटेल हे भरभराटीला आलेले असते. परगावाहून येणारा कोणताही प्रवासी हा प्रथमत: हॉटेल शिवशंकर मध्ये येत असे. त्या प्रवाशाची सोय चांगल्या पद्धतीने करीत असे. त्यामुळे लोक त्या हॉटेलला 'सुदामाचे हॉटेल' असे म्हणत असे. असा हा सुदामा मात्र मनोमनी उदास होता. आजूबाजूचे लोक सुदामाविषयी वेगवेगळे नको ते तर्क करीत असत. अशावेळी आपली व्यथा कुणाला तरी सांगावे असे सुदामाला वाटायचे. एके दिवशी सुदामा खुशीत होता. त्या दिवशी पहिल्यांदाच अगदी आस्थेने त्याच्या घराबद्दल विचारपूस केली होती. तेव्हा त्या व्यक्तीला आपण सत्य माहिती सांगावी असे वाटू लागले व आपल्या जीवनाची कर्मकहाणी सांगण्यास सुरूवात केली.

या कहाणीची सुरूवात सुदामाच्या गावाबाहेर असणाऱ्या तुकाईच्या माळापासून सुरू होते. त्या माळावर एक भले मोठे हिवराचे झाड असते. त्या झाडापासून दोन वाटा गेलेल्या असतात. एक वाट देवाच्या वाडीला व दुसरी वाट नांदूरला गेली असते. दोन्ही गावाच्या लोकांना हिवराच्या झाडाचे खूप आकर्षण असते. ग्रामीण भागातील लोकांना झाडाचा कितपत उपयोग होतो. त्यांच्या जीवनात एक महत्त्वपूर्ण घटक असणारे झाड याचे दर्शन लेखक या कादंबरीतून घडवतात.

सुदामा हा देवाची वाडीत राहत असतो. देवाच्या वाडीतील घराची रचना, तेथील वस्ती, तेथील वेगवेगळी झाडे, मंदिर यांचे चित्रण लेखक करतात. त्याचबरोबर लेखकानी तेथील ग्रामपंचायत, सोसायटीचे ऑफीस, प्राथमिक शाळा, शाळेची स्थिती याचा आढावा कादंबरीत चित्रित केला आहे. लेखकानी आपल्या लेखणीतून संपूर्ण वाडीचे दर्शन हुबेहूब मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

खेडेगावातील लोक हे शेतीवर अवलंबून असतात आणि ही शेती पावसावर अवलंबून असते. देवाची वाडीमध्ये पाऊसकाळ फार कमी होता. कारण त्या भागात

डोंगर होते, पण झाडे कमी असल्यामुळे पाऊस कमी होता. जो काही पाऊस पडेल त्याच्यावरती शेती पिकत असे. अशा अवस्थेतसुद्धा तेथील लोक समाधानी होते. अशा लोकामध्ये नाना नावाची व्यक्ती गावात प्रतिष्ठित असते. त्यांचा मुलगा सुदामा. सून मालन व नात असा त्याचा परिवार असतो.

नाना खूप कष्टाळू असतात. वृद्ध असूनसुद्धा त्यांनी कधी शेताकडे दूर्लक्ष केले नाही. लेखकानी नानाच्या व्यक्तिरेखेतून त्याच्या कष्टाळू स्वभावाचे दर्शन कादंबरीतून घडवतात. एके दिवशी पायावर दगड पडल्याचे निमित्त होते व त्यातच त्यांचा मृत्यू होतो. नाना सुदामाला व सूनेला सतत सांगायचे "नीट राहा, सांभाळा, शेतापोताची आबाळ करू नका." यातून वयस्कर व्यक्तीच्या जीवनात शेतीविषयी असणारी श्रद्धा याचा प्रत्यय या विधानातून नजरेस येतो.

नानाच्या मृत्यूनंतर कुटूंबाची सर्व जबाबदारी सुदामावर पडली. सुदामची बायको मालन ही सुदामला शेताकडे जाण्यास सांगते. शेताकडे गेल्याशिवाय शेती पिकणार नाही. शेतीविषयी आवड निर्माण होणार नाही. म्हणून ती सतत सुदामाला शेताकडे जाण्यास आग्रह करीत असते. वेळच्यावेळी सुदामाची ती काळजी घेत असे. पण एके दिवशी उत्तरेश्वर या व्यक्तीकडून सुदामा हा शेतात न जाता कुठे जातो याची माहिती मालनला कळते. सुदामा हा शेतात जाण्याऐवजी मारूतीच्या देवळात मित्राबरोबर पत्यांचा डाव खेळत असे. गावातून फिरणे, ग्रामपंचायतमध्ये बसणे असा त्याचा दिनक्रम होता.

या कारणामुळे सुदामा व त्याची पत्नी यांच्यात भांडण होत असे. एके दिवशी तो गावच्या ग्रामपंचायतीच्या ऑफिसात गेला असताना तेथील पंख्याचा गारवा. बसायला खुर्ची या गोष्टीमिळाल्यामुळे व तेथील वातावरण पाहून तो आनंदित झाला व त्याला तिथे रोज जावे असे वाटू लागले. सुदामा रोज ऑफिसात जावू लागला. जणू तो तेथील मेंबरप्रमाणे राहू लागला. एकेदिवशी सुदामा ऑफिसात बसला असताना

फॅक्टरीतील ऊसतोडणीचा मुकादम त्रिंबकराव हा ऑफिसात आला. त्यांनी ऑफिसमधील साहेबांना फॅक्टरीची माहिती सांगू लागला, "आमच्या फॅक्टरीत मायंदळ पैसा. फॅक्टरी सुरू झाली म्हंजी बघा सहा तास काम करायच आन् अठरा तास निस्त बसायचं. पर आठशे रूपयाला मरण नाही."[९] यातून त्रिंबकराव लोकांना अमिष दाखवण्याचा प्रयत्न करीत होता. इतकेच नव्हे तर "अवं सादा गाडीवान पंधरा दिवसात एक सोन्याची अंगठी करतोय तर आमचं काय नवल?"[१०] असे त्रिंबकराव सांगतो. या त्रिंबकरावाच्या भूलथापांना, अमिषाला सुदामा बळी पडतो व ऊसतोड करण्यासाठी तो तयार होतो.

समाजातील साध्या भोळ्या लोकांना लोक कसे फसवतात व आपला स्वार्थ साधून घेतात याचे दर्शन लेखक यातून घडवतात. सुदामा व त्रिंबकरावांची चांगली दोस्ती जमते. त्रिंबकराव सुदामाच्या घराकडे रोज येत असे. सुदामाच्या पत्नीला समजते की आपला पती हा साखर कारखान्यात ऊसतोड करण्यासाठी जाणार आहे. तेव्हा त्या कामाला ती विरोध करते. ती म्हणत असते, "तिकडचं काय कामाचा ढिगारा हाय अन् हित काम नाय?" अशी समजूत ती सुदामाची काढत होती. पण सुदामा हा पूर्णपणे त्रिंबकरावाच्या फसवेगिरीला बळी पडला होता. सुदामाच्या पत्नीला याबाबत खूप वाईट वाटत होते. मालनला इथली शेती, गाव हे खूप आवडत होते. इथेच काम करून सुखाने राहावे अशी तिची इच्छा असते. याबाबत तिचे हे विधान महत्त्वाचे ठरते. 'आपल्या शेतात मायदळ काम हाय. तेच सरता सरता सरत नाय अन् दुसरीकडे काय करायच?आपल्या शेताचा दुष्काळ करून दुसऱ्याच्या कारखान्यावर काम करणं बर हाय व्हय? जिथ मालकी तिथं मालक म्हणून राहायचं नाय अन् दुसऱ्याच्या घरी चाकर म्हणून राहणं लय चांगल हाय व्ह?"[११] लेखकानी ग्रामीण भागातील स्त्री ही कशी विचारी व समाधानी असते याचे दर्शन कादंबरीतून घडवतात. तसेच सुदामासारख्या व्यक्तीमुळेच त्याच्या लोभामुळेच आज खेडी ओस पडत आहेत. खेड्याचा, शेतीचा ऱ्हास होत आहे. याचा प्रत्यय या कादंबरीतून नजरेस येतो.

मुकादम त्रिंबकराव हा सुदामाबरोबर गावातील अनेक लोकांना पैशाचे, कामाचे आमिष दाखवून त्यांना फटकरीला जाण्यासाठी प्रवृत्त करतो. पण या पैशाच्या लोभात गावकऱ्यांना गावातील शेतीचा विसर पडला होता. चार पैशाच्या लोभासाठी फॅक्टरीवर फटकरीचे काम करण्यात तयार झालेले असतात. शेवटी मालनलासुद्धा सुदामाबरोबर जाणे भाग पडते.

फॅक्टरीला जाण्यासाठी देवाच्या वाडीतील लोक आसुसलेले होते. जो तो आपआपल्या तयारीत मग्न होता... सर्वजण आपल्या बायका पोरासह तयारीत असतात. चार आठ दिवस पुरेल इतके तेल, मीठ, पीठ सोबत घेतात. सर्वजण फॅक्टरीतील कामाच्या येणाऱ्या पैशाची स्वप्ने रंगवित असतात. कोणी त्या पैशापासून डाग करणार असतात तर कोणी सोने अशा अपेक्षेने लोक फॅक्टरीवर जाण्यास तयार असतात. गावामध्ये म्हाताऱ्या माणसाशिवाय कोणी मागे राहत नाही. सुदामा हा अगदी रूबाबात होता. चांगल ठेवणीतलं पांढर कुडतं, गळ्यात काळा दोरा असा पोशाख करून तो सर्वात पहिला बैलगाडी घेवून बाहेर पडला. त्याच्यापाठोपाठ सर्व गाड्या फॅक्टरीकडे निघाल्या आणि संपूर्ण गाव ओस पडला. त्यावेळी त्यांना शिवेपर्यंत सोडण्यासाठी गावातील वयस्कर व्यक्ती येतात, 'सांभाळून ऱ्हावा' ह्या शब्दातून ते निरोप देतात. यातून लेखकानी वृद्ध व्यक्तींच्या दु:खाचे चित्रण यातून घडवतात. गावातून बाहेर पडल्यानंतर गावाबाहेर असणाऱ्या मारूतीला सर्वजण पाया पडतात व तसेच मरीआईकडे 'अंबाबाई सुखरूप ठेव.' असा आशिर्वाद मागतात. यातून लेखकानी ग्रामीण भागातील लोकांचे देवदेवतावर असणारी श्रद्धा, विश्वास याचे दर्शन कादंबरीतून घडवतात. त्याचबरोबर प्राथमिक शाळेच्या अवस्थेचे चित्रण महत्त्वपूर्ण ठरते. यातून लेखकानी ग्रामजीवनाचे अस्सल प्रतिबिंब मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

देवाच्या वाडीतील लोक फॅक्टरीमध्ये गेल्यानंतर तेथील अवाढव्य कारखाना, यंत्राचा कर्णकर्कश आवाज, भोंग्याचा, बैलगाड्या, फटफटी यांचा आवाज ऐकून ते

अचंबित होतात. त्यांना तेथील वस्तूंचे नवल वाटू लागते व सर्वजण कावरे-बावरे होतात. बायका एकमेकीच्यात विचारपूस करीत असतात. तर पुरूष मंडळी हे जवळच वाकड्या बाभळीखाली असलेल्या 'चिच्याच्या' हॉटेलात चहा घेण्यासाठी जातात. हे हॉटेल अब्दुल गौस (चिच्या) देवळालीवाले यांचे असते. अशा चिच्याची माहिती लेखक या कादंबरीत मांडतात. चिच्याची वडिलांची खूप जमीन होती पण रझाकाराच्या हल्यामुळे ते गाव सोडून पळून जातात. यावेळी गाववाले त्यांची सर्व संपत्ती, मालमत्ता हडप करतात. अब्दुल गौसला घर नसल्यामुळे तो पीराजवळ राहू लागतो. नंतर तेथेच एक घर बांधून तो संसारात रमतो. व त्यांनी वाकड्या बाभळीखाली 'शमा हॉटेल' सुरू केले. त्या हॉटेलात फॅक्टरीमधील अनेक कामगार, गाडीवान येत असत. असा हा चिचा नवीन गाडीवानाला, मजूरांना व्यवस्थित समजावून सांगत असे. तसेच तो वेळोवेळी कानउघडणी ही करीत असे. अशा चिच्याबरोबर सुदामाची ओळख झाली होती. चिच्या सर्वांना म्हणत असे 'आर्र ह्येच गलती करता है लोगा. जनाना का क्यू लानेका?'[१२] चिच्याला बायको पोराना आणलेलं आवडत नव्हते पण त्याचे हे बोलणे कोणी मनावर घेत नव्हते. लेखकानी चिच्या या माध्यमातून कामगाराच्या अवस्थेचे चित्रण केले आहे.

देवाच्या वाडीच्या मजुराना धातूऱ्याच्या शेतावर पहिले ऊसतोडणीचे काम मिळाले तो चार एकराचा फड होता. आठ दिवस काम चालणार होते. मळ्यात खोपटी घालून मजूर राहिले होते. हे उघड्यावरचे जीवन त्यांना नवीन होते. देशमुखाच्या शेतातील हिरवीगार पिके पाहून सर्वजण आश्चर्यचकित झाले होते. त्या फडाचा मालक कारखान्याचे डायरेक्टर असतात. त्यांना ऊसतोडणीसाठी लागणारा कोयता त्रिंबकराव आणून देतात. व त्यांचे ऊसतोडणीचे काम सुरू होते. पहिल्याच दिवशी काम मिळाल्यामुळे सर्वजण आनंदित असतात. नवीन हत्यारे व जोश यामुळे ऊसतोडणीचे काम जोरात सुरू होते. व त्या ऊसाला साळायचे काम बायका करीत होत्या. अशा तऱ्हेने पहिल्या खेपेपासून त्यांनी कमाईला सुरूवात केली पण ऊसतोडणी चे काम करीत

असताना त्यांच्या शरीरावर अनेक ठिकाणी ऊसाचा पाला कापला होता आणि या कापलेल्या भागावर चरचरत होते. "त्याच्या आयला ऊसाच्या चिपाडान चांगलाच दणका दिला."[१३] असे प्रत्येकजण म्हणत होता. यातून ऊसतोडणी कामगाराच्या हालअपेष्टाचे दर्शन लेखक नजरेस आणतात. अशा तऱ्हेने चार एकरांचा फड त्यानी काही दिवसातच संपविला. सगळ्यांच्या अगोदर त्यांच्या गाड्या फॅक्टरीत जावू लागल्या. आपल्या शरीराची जरासुद्धा काळजी न घेता जीव तोडून ते काम करू लागले. त्यांना पाहून सर्वजण आश्चर्यचकित होत असत. अशी चढाओढ, इर्षा कामावर सुरू होती. पहिले काही दिवस माणसाबरोबरच जनावरेही अगदी उत्साहाने कामे केली पण आठ, दहा दिवसातच जनावरांचा रंग बदलून गेला. बरगड्या दिसू लागल्या. पण या जनावरांच्या अवस्थेकडे बघायला मालकाला वेळ नव्हती. ते आपल्याच कामात मग्न होते. फॅक्टरीमधील काम करणाऱ्या लोकांची एक भली मोठी वसाहत होती. त्यामध्ये सटरफटर काम करणारे, साखरेच्या गोण्या उचलणारे, ट्रक ड्रायव्हर, क्लिनर, ट्रॅक्टरवाले लाईनमन अशी वेगवगळी कामे करणारे लोक त्या वस्तीत होते. तसेच खानावळी, हॉटेल, पेट्रोल पंप, एस. टी. स्टँण्ड, दवाखाना व अनेक दुकाने त्या ठिकाणी होती. लेखकानी  फॅक्टरीत असणारे सर्व व्यवसायांचे अगदी बारीक घटकांचे सुक्ष्म चित्रण केले आहे. फॅक्टरीच्या सभोवताली असणारे व्यवसाय हे मजूरावरती कसे अवलंबून असतात व त्या पद्धतीने त्यांचे जीवनमान कसे चालते याचे दर्शन या कादंबरीतून घडते.

लेखकानी उसतोड कामगाराच्या व्यथा वेदने बरोबर त्यांच्य कामात हातभार लावणाऱ्या बैलाच्या होणाऱ्या कष्टांचे चित्रण कादंबरीत करतात. ऊस ओढून बैल कमजोर झालेली असतात, ऊसतोडणीचे काम चालू झाल्यापासून त्या बैलाच्या मानेवरचं 'जू' कधी खाली ठेवलेल नसतं. त्यामुळे त्या मानेवर जखम झाली होती. त्या जखमेवर माशा बसत असत. असे प्रत्ययकारी चित्रण लेखकानी केले आहे. सुदामा व त्याची पत्नी अगदी मजेत होते. त्यांना ऊसतोडणीचे काम अगदी अंगवळणी पडलेले असते.

रोज सकाळी पहाटे उठणे, आपल्या भाकरी तुकड्याची कामे करणे आणि आपला पती सुदाम्याबरोबर कामाला जाणे. हा सुदामाच्या मालकिणीचा दिनक्रम असतो. एके दिवशी कामाला सुट्टी असते. त्यावेळी सर्वजण आपली वैयक्तिक कामे करतात. सुट्टीदिवशी लोक टापटिपीत राहत असत. बायका सारवणं, भांडीकुंडी धुणे व कपडे धुणे अशा प्रकारची कामे काढतात. दररोज आंघोळ करायला सवड नसल्यामुळे सुदामाची बायको आठवड्यातून एकदाच चोळून-मोळून आंघोळ करते. पण ती आंघोळ करीत असताना एक व्यक्ती उसाच्या फडातून तिला शीळ घालतो आणि ती घाबरते. यातून लेखकानी ग्रामीण भागातील स्त्री ही खानदानी घरातील असते व ती गरीब असली तरी तिला इज्जत प्यारी असते. याचे दर्शन कादंबरीतून घडवतात. वाडीच्या मजुरांची चिच्याच्या हॉटेलात उधारी झाली होती. सुदामाने सुद्धा चिच्याच्या हॉटेलात उधारी लावली होती. तो बायकोला शेव-भजी घेवून जायचा. सुदामाला कोण जर चांगले म्हटले तर त्या लोकांना तो चहा, भजी देत असे. अशा वृत्तीमुळे कुणाकडे किती उधारी झाली आहे याकडे तो बघत नसे. पण अशा या सुदामाला चिच्या सतत सांगायचा की फुकटखाऊ लोकांना पैसे खर्च करू नकोस. त्यांना तेवढच बर हाय. तेच पैसे तुझ्या मुलाबाळाना खायाला घाल असे समजावून सांगत असे.

सुदामाला सुद्धा ही गोष्ट पटते. ज्या आशेने आपण फटकरीला आलो तो उद्देश काही साध्य होईना म्हणून तो नाराज होवू लागतो. मोठमोठ्या आशेन तो फटकरीला आलेला असतो. पैसा कमवू, सोन घेऊ पण चार महिने झाले तरी सोन्याचा पत्ता नाहीच पण आलेला पगार लगेच संपतो. उलट लोकांची देणी वाढतात, त्रिंबकरावाचे पैसे फिटलेले नसतात. यामुळे सुदामा सतत झुरत असतो. सुदामासारखी अवस्था अनेकांची झालेली असते. बऱ्याच लोकांनी चिच्या दुकानदार, दारू अड्डेवाले, पीठ गिरणवाला, हॉटेलवाले यांची उधारी केलेली असते. त्यामुळे पगारा दिवशी ह्या लोकांना भागवून त्यांच्याजवळ काहीच राहत नसे. काही वेळेला तर देणेकरी हिसकावून

पैसे घेत असत. तर कोणी मारहाण करीत असत. बाजाराचा दिवस असूनही त्यांच्या घरची चूल पेटलेली नसायची. लेखकानी कामगाराच्या आयुष्याची झालेली दुर्दशा याचे प्रभावी चित्रण या कादंबरीतून करतात.

सुदामा हा आपल्या पगारातून काही जणांची उधारी भागवून घराकडे जातो त्याला पश्चाताप होत होता. तो रागाच्या भरातच घराकडे येतो. सुदामाची बायको ही झोपडीच्या मागे इराकतीला जाते पण अचानक ती घाबरते हा प्रकार पाहण्यासाठी सुदामा पुढे गेला तेवढ्यात फडातून शीळ ऐकू आली. तेव्हा सुदामा ती व्यक्ती पाहण्यासाठी फडात गेला पण त्याच्या नजरेस कुणी आले नाही. उसात वाऱ्याची सळसळ होतीय. त्याचा तुला आवाज आला असेल अशी समजूत सुदामाने काढली पण मालन खूप घाबरली होती. सुदामाला सुद्धा शीळ घालणारी व्यक्ती कोण असेल? असा विचार येत होता.

रात्रंदिवस कारखाना चालू असल्यामुळे जवळपासच्या भागातील ऊस संपला होता. लांबचा ऊस हा ट्रकांनी यायचा. जवळचा ऊस बैलगाड्यानी यायचा. जसजशी तोडणी संपत आली तसतसे बैलगाड्यांना लांबचा ऊस आणावा लागत असे. कामगारानी गाव सोडून खूप दिवस झालेले असतात. होळीचा सण जवळ येतो.. त्यानंतर गावोगावी देवदेवीची जत्रा भरू लागल्या, पीराचा उरूस होवू लागला. लेखकानी खेडेगावातील यात्रांचे, देवदेवतांचा उल्लेख या कादंबरीत केला आहे. शिखर शिंगणापूर, तुळजाभवानी, जेजुरीचा खंडोबा आणि येरमाळ्याच्या येडाईची जत्रा अशा यात्रा होवू लागल्या. त्यानंतर लग्नाच्या तिथी निघू लागल्या वऱ्हाडी मंडळीची धावपळ वाढली. त्यामुळे वाडीच्या मजूराना सुद्धा गावाची ओढ लागली. जो तो गावाकडे जाण्याच्या विचारात होता. सुदामाला सुद्धा गावाकड कधी जाईन असे झाले होते. ही बातमी सुदामा आपल्या पत्नीला सांगतो त्यावेळी ती आनंदित होते.

दुसऱ्या-तिसऱ्या दिवशी त्रिंबकराव कामावर येतात. सोबत त्यांचा मित्र गबरू आलेला असतो. त्यावेळी त्रिंबकरावाना समजते की, सर्व मजूर गावाकडे जाणार आहेत पाऊसकाळ जवळ आल्यामुळे चार दिवस अगोदर गेलोतर शेतीची मशागत करता येईल यामुळे सर्वजण गावाकडे जाण्यासाठी तयार झालेले असतात. पण त्रिंबकरावने आणखीन एक काम आणलेले असते. त्यावेळी त्रिंबकराव सांगतात की गबरू मालकाचा वाघोलीला चार एकर ऊस आहे. "दोन दिवसाच तर काम हाय, तेवढं करा म्हंजी तुमचं तुम्ही ठरलेल्या दिवशी गावाकड निघा."[१४] वाडीच्या मजूरांनाही नाही म्हणता येईना. शेवटी तो ऊस तोडण्यास वाडीचे मजूर तयार झाले. वाडीतील सर्व मजूर थकून गेले होते. त्यामुळे ते उशिराने निघाले. त्यावेळी बारकी आजारी असते. बारकीला उन्हात खेळल्याच निमित्त झाले होते. मालनने तिला पऱ्यागबाईचा अंगारा लावला होता. वाडीच्या मरी आईला हातही जोडले होते. बारकीच्या विचारातच सुदामा कामावर गेलेला असतो. ती उपाशी पोटीच कामावर गेलेला असतो. कामावर सुदामची मनस्थिती ठिक नव्हती. महादुने त्याला बारकीबद्दल धीर दिला पण सुदामाचे काय मन लागेना. त्याने तोडणी बंद केली व तोडलेला ऊस घेवून कारखान्याकडे गेला. सुदामा हा चिच्याच्या हॉटेलात गेला. चहा घेतला व बारकीला शेवची पुडी घेवून तो झोपडीकडे आला. झोपडीकडे जावू लागला. तेवढ्यात त्याला शीळ ऐकू आली. त्याने आपल्या हातात कोयता घेतला. सुदामा हा झोपडीच्या डाव्या बाजूने ऊसात शिरला व सरीमध्ये लपून बसला. झोपडीत सामसूम हाय असा विचार करून गबरू झोपडीकडे निघाला. तेवढ्यात सुदामाने गबरूवर वार केला. त्यात गबरूचा हात तोडला जातो. व रक्तबंबाळ झालेला गबरू पळून जातो. सुदामा झोपडीकडे येतो व मालनला झालेला प्रकार समजावून सांगतो व गावाच्या माणसाबरोबर गावाकडं जा. पोरीला सांभाळ असा धीर देतो व रक्तबंबाळ झालेला गबरू आपल्यावर केस करील या भीतीने तो फरारी होतो. त्यानंतर तो आंबेगावच्या हॉटेलात कामाला येतो सुदामाने ही कहाणी ज्या व्यक्तीला

सांगितलेली असते. ती व्यक्ती साध्या वेशातील पोलिस असतो. तो लगेच सुदामाला अटक करून घेवून जातो. अशाप्रकारे या कादंबरीचा शेवट होतो. धुराळा या कादंबरीबद्दल डॉ. सुनिल चंदनशिवे म्हणतात, ''सुदामाच्या जीवनाचे रहस्य शेवटपर्यंत लेखकाने उलघडू दिले नाही. हेच या कादंबरीचे यश आहे.''[१५] यावरून कादंबरीचे निराळेपण समजते.

ऊसतोडणीच्या कामावर जावून भरपूर पैसा मिळविण्याच्या नादात सुदामाचे सारे घरदार उध्वस्त होते व शेवटी नियतीही त्याला हॉटेलमध्येही जगू देत नाही. पोलिसांच्या स्वाधीन करते. अशा ऊसतोडणी कामगाराच्या जीवनाची चित्तरकथा 'धुराळा' या कादंबरीत योगीराज वाघमारे यांनी मांडली आहे. निरागस, प्रामाणिक, साध्या भोळ्या सुदामाच्या जीवनाची कर्मकहाणी व फटकरीने केलेला त्यांच्या जीवनाचा धुराळा म्हणजे सदर कादंबरी होय.

## संदर्भ सूची


| | | | |
|---|---|---|---|
| १. | देशपांडे कुसमावती | : | 'पांसग', मौज प्रकाशन, मुंबई, चौथी आवृत्ती, एप्रिल १९८७, पृ. ७७ |
| २. | वाघमारे योगीराज | : | 'पडझड', हर्ष प्रकाशन, सोलापूर, प्रथमआवृत्ती, फेब्रु. २००५, पृ.२५. |
| ३. | वाघमारे योगीराज | : | उ. नि. पृ. २०. |
| ४. | वाघमारे योगीराज | : | उ. नि. पृ. ३६. |
| ५. | वाघमारे योगीराज | : | उ. नि. पृ. ४१. |
| ६. | वाघमारे योगीराज | : | उ. नि. पृ. ४६. |
| ७. | वाघमारे योगीराज | : | उ. नि. पृ. ५१. |
| ८. | वाघमारे योगीराज | : | उ. नि. पृ. ६९. |
| ९. | डॉ. चंदनशिवे सुनिल वामन | : | ''ग्रामीण दलित नवसाहित्य आकलन आणि आस्वाद'', प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, प्र. आ., २२ मार्च २००७, पृ. ५०. |
| १०. | वाघमारे योगीराज | : | 'धुराळा', हर्ष प्रकाशन, सोलापूर, प्रथमआवृत्ती, फेब्रु. २००५, पृ. ४०. |
| ११. | वाघमारे योगीराज | : | उ. नि. पृ. क्र. ४२ |
| १२. | वाघमारे योगीराज | : | उ. नि. पृ. क्र. ४५, ४६ |
| १३. | वाघमारे योगीराज | : | उ. नि. पृ. क्र. ५८ |
| १४. | वाघमारे योगीराज | : | उ. नि. पृ. क्र. ६० |

१५. डॉ. चंदनशिवे सुनिल वामन : "ग्रामीण दलित नवसाहित्य आकलन आणि आस्वाद", प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, प्र. आ., २२ मार्च २००७. पृ. ५३.

BARR. B... ...B KH... DEK... LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.